संक्षिप्त फौ. ख. क्र.९२/२०२२
सरकार -वि.- लखन
नि.क्र. २ खाली.

सरकार तर्फे साक्षीदार क्र.५ यांची जबानी

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

माझे नाव - सुभाष किशोर जांभुळे,
वय २५ वर्षे, व्यवसाय – ट्रक चालक,
राहणार – येरवा, ता. चिमूर, जि. चंद्रपूर.

**सरतपासणी-सहायक सरकारी अभियोक्ता श्री एस.एस.मोरे यांचे मार्फत**

१. घटना सन २०२२ मध्ये घडली होती. मी त्यादिवशी कारगाव गावामध्ये कामासाठी आलो होतो. त्यावेळी माझ्यासोबत वैभव नन्नावरे हा कामाला होता. त्यानंतर वैभव कामावर आला व त्यानंतर सायंकाळी दारु पिण्याकरिता गेला. त्यावेळी मी भिवापूर फाट्यावर थांबलो व वैभव भिवापूर येथील भट्टीवर दारु पिण्याकरिता गेला. त्यानंतर तो माझ्याकडे आला. त्याच्याकडे त्यावेळी मोटार सायकल होती व तो त्यावेळी खूप दारु प्यायलेला होता. त्यावेळी मी माझ्या मोटार सायकलने व वैभव त्याच्या मोटार सायकलने उखळी सुकळीकडे निघालो. त्यावेळी एक व्यक्ती माझ्यासोबत मोटार सायकलवर बसत होता तेव्हा वैभव वेगात पुढे निघून गेला व तो नक्षी फाट्याजवळ पडलेला होता. तो कसा पडला होता ते मला माहीत नाही.
सरतपास संपला.

**सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास उलट तपासात विचारण्याजोगे प्रश्न विचारण्यास परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली. उलट तपास - सरकार तर्फे**

२.  आता मला माझ्या बयानातील अधोरेखीत भाग अ वाचून दाखविण्यात आला. तसे काही घडले नव्हते. तसे माझ्या बयानात का लिहून घेतले याचे कारण मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला वाचविण्यासाठी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास आरोपी तर्फे त्यांचे वकील श्री नागोशे यांचे मार्फत**

३.  नाकारला.
उलट तपास संपला.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,
माझे समक्ष,

दिनांक - १७.०४.२०२६

स्वा/-
(एस. जे. लाड)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
भिवापूर.